# प्रेसनोट ता. ०९/०७/२०१८

## मौजमजेसाठी आलिशान मोटार सायकली चोरणाऱ्या ०५ इंजिनिअरींगच्या विद्यार्थ्यांना अटक

विमानतळ पोलीस स्टेशन हद्दीत गस्त करीत असताना लोहगाव परिसरात इसम नामे सोहेल गुलाब शेख, वय १९ वर्षे रा. लोहगाव पुणे. हा संशयीत रित्या के.टी.एम. मो.सा. वरुन फिरत असताना आढळुन आल्याने त्यास पोलीस नाईक सारंग दळे यांनी पकडुन त्यास विमानतळ पोलीस स्टेशन पुणे येथे घेवुन आले असता त्यांचेकडे श्री दिलीप शिंदे व.पो.नि. व श्री रमेश साठे, पो.नि. गुन्हे, यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि. खोकले, पो उप निरी. आनंदराव पिंगळे, दिपक जाधव तसेच तपास पथकाचे कर्मचारी संभाजी तांबे, मोहन काळे, विजय सावंत, संजय आढारी, सचिन भिंगारदिवे, राहुल मोरे, विशाल गाडे, विनोद महाजन, प्रशांत कापुरे, प्रदीप राऊत, दिपक सानप, वसिम सय्यद, अजय विधाते, स्वप्निल जाधव तसेच विकास शिंदे व पुष्पेंद्र चव्हाण यांच्या तांत्रिक सहकार्याने तपास करुन त्याचे मार्फतीने त्याचे साथीदार नामे १) आदेश ऊर्फ विनायक रामचंद्र शिंदे, वय १९ वर्षे, रा. परभणी. २) आशिष सुनिल सरदार, वय २० वर्षे, रा. मलकापुर जि. बुलढाणा, ३) माधव कृष्णा गोपाळ प्रसाद सिंह, वय १९ वर्षे, रा. वेलुसराय, राज्य बिहार, ४) किरण खैरनार, रा. नाशिक, ५) सोमनाथ प्रकाश पाटोळे, वय २३ वर्षे, रा. आळंदी पुणे यांचा शोध घेवुन त्यांचेकडे सखोल तपास करुन त्यांचेकडुन पुणे शहर व पुणे ग्रामीण परिसरामधुन चोरलेल्या ०४ बुलेट मो.सा., ०४ के.टी.एम. मो.सा., ०३ पल्सर मो.सा., ०१ करिझ्मा मो.सा.,०१ युनिकॉर्न मो.सा., ०१ ॲक्टीवा मो.सा.,०१ ज्युपिटर मो.सा., ०१ डॉमिनॉर मो.सा.,०१ आर १५ मो.सा. ०१ सी. डी. डिलक्स अशा एकुण १८ मो.सा. २१,८५,०००/- रु.कि. च्या आलिशान मो.सा. हस्तगत करुन विमानतळ ०२, आळंदी ०३, डेक्कन ०२, विश्रांतवाडी ०२, चंदननगर ०२, दत्तवाडी ०१, वानवडी ०१, विश्रामबाग ०१, खडक ०१, स्वारगेट ०१, कोथरुड ०१ या पोलीस स्टेशनकडे एकुण १७ गुन्हे उघडकीस आणले आहेत. तपासामध्ये सदरचे आरोपी हे कॉलेजमध्ये शिक्षण घेत असुन गाड्या चोरुन त्या विक्री करुन येणारे पैसे मौजमजा करण्यासाठी खर्च करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा. श्री. दिपक साकोरे, भा.पो.से. पोलीस उपायुक्त परि. ०४ पुणे शहर, श्री गणेश गावडे, सहा.पोलीस आयुक्त, खडकी विभाग पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक, आनंदराव पिंगळे व सहा. पोलीस निरीक्षक खोकले हे करीत आहेत

प्रेसनोट ता. ०९/०७/२०१८

# विमानतळ पोलीसांकडुन पिस्तुल बाळगणाऱ्या सराईतास व तडीपारास अटक.

विमानतळ पोलीस स्टेशन कार्यक्षेत्रात वाढत्या गुन्हेगारीस आळा घालण्याकरीता श्री दिलीप शिंदे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, व श्री रमेश साठे, पोलीस निरीक्षक गुन्हे यांचे मुखजल आदेशाने विमानतळ पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक पिंगळे यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे श्री खोकले, स.पो.नि., मोहन काळे, विजय सावंत, संजय आढारी, सचिन भिंगारदिवे, विशाल गाडे, राहुल मोरे, प्रशांत कापुरे, विनोद महाजन, प्रदीप राऊत, पुष्पेंद्र चव्हाण यांनी सापळा रचुन एक चोरीची बुलेट मो.सा.सह आरोपी नामे १) सोमनाथ प्रकाश पाटोळे ऊर्फ बाबा वय- २३ वर्षे रा. मु. पो. सोळु ता. खेड जि. पुणे. २) सिध्देश सिताराम गोवेकर, वय २५ वर्षे, धंदा व्यवसाय, रा. वडमुखवाडी चऱ्होली बुद्रुक, ता. हवेली जि. पुणे. यांना ताब्यात घेण्यात आले असुन क्र. ०१ याचे ताब्यातुन एक रिव्हॉलव्हर व ०४ जिवंत काडतुस जप्त करण्यात आले आहेत, तसेच त्याचे सोबत असलेला आरोपी नामे सिध्देश सिताराम गोवेकर, वय २५ वर्षे, धंदा व्यवसाय, रा. वडमुखवाडी चऱ्होली बुद्रुक, ता. हवेली जि. पुणे. याचेबाबत चौकशी करता त्यास मा. पोलीस उपायुक्त परि. ०४ पुणे शहर यांचे आदेशाने एक वर्षाकरीता पुणे जिल्ह्यातुन तडीपार केले असताना तो तडीपार केलेल्या हद्दीत मिळाल्याने सदर इसमास अटक करण्यात आले आहे.

सदर गुन्ह्याचा तपास मा. श्री. दिपक साकोरे, भा.पो.से. पोलीस उपायुक्त परि. ०४ पुणे शहर, श्री गणेश गावडे, सहा.पोलीस आयुक्त, खडकी विभाग पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक एम आर खोकले हे करीत आहेत.


विमानतळ पोलीस स्टेशन
रामवाडी,पुणे-१४.
फोन नं. ०२०-२६६३३८८८